Vol 6 Issue 12 Jan 2017
ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY - 2017

# भंडारभोग : कादंबरीचा एक शोध

आरती विजयकुमार भोसले
मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे



### प्रास्ताविक :

ऐंशीच्या दशकातील अनेक लेखकांनी बदलत्या सामाजिक वास्तवावर प्रखर भाष्य करून आपल्या जाणिवा साहित्यातून व्यक्त केल्या. अशाच लेखकांपैकी राजन गवस हे मराठी साहित्यातील महत्वाचे साहित्यिक आहेत. राजन गवस यांनी आपल्या वाङ्मयीन वाटचालीमध्ये कथा, कविता, कादंबरी, ललित निबंध आणि समीक्षा असे विविध साहित्यप्रकारात लेखन केलेले आहे. आतापर्यंत 'चौंडक' (१९८५), 'भंडारभोग' (१९८८), 'धिंगाणा' (१९९१), 'कळप' (१९९२), 'तणकट' (२००१), 'ब-बळीचा' (२०१२), 'उफरळ' या सात कादंबऱ्या, 'रिवणावायली मुंगी' (२००१) व 'आपण माणसात जमा नाही' (२००९) हे दोन कथासंग्रह, 'काचाकवड्या' (२००६), 'रोकडे पाझर' (२००९) व 'कैफियत' (२०१०) हे तीन ललित लेखसंग्रह आणि 'हुंदका' (१९८२) हा एकमेव काव्यसंग्रह प्रकाशित आहे. याशिवाय 'भाऊ पाध्ये यांची कादंबरी' (२००७) व 'भाऊ पाध्ये यांची कथा' (२०१०) हे समीक्षाग्रंथ तसेच 'मराठीचे आशययुक्त अध्यापन' (१९९५) हे संशोधनात्मक शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर पुस्तक, 'सीमाभागातील मराठी बोली' (२०१०), तृतीयपंथियांची बोली (२००८) ही देखील पुस्तके प्रकाशित आहेत. 'तिरकसपणातील सरळता' (१९८५), हे रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीवरील समीक्षणात्मक लेखांचे संपादन व 'चांगदेवचतुष्टयाबद्दल' (२०००) हे भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीवरील लेखाचे महत्वपूर्ण संपादन त्यांनी केले आहे.

राजन गवस यांच्या साहित्याची भूमी ही महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील आहे. येथील प्रथा-परंपरांसह तेथील सांस्कृतिक संचितही त्यांच्या साहित्यातून आले आहे. यामुळेच देवदासी प्रथा, जोगते-जोगतीण या प्रथा व या प्रथांमुळे देवदासी जोगते-जोगतीण यांच्या जीवनावरील प्रश्नांच्या शोधातून आलेल्या 'चौडकं' व 'भंडारभोग' या दोन कादंबऱ्या आहेत.

सामाजिकदृष्ट्या वंचित, उपेक्षित असणारे जोगते व जोगतीणी यांच्या जीवनव्यवस्थेचे प्रभावी चित्रण भंडारभोग या कादंबरीत लेखकाने केलेले आहे. देवदासींप्रमाणे समाजाच्या धर्मश्रद्धेचा बळी म्हणजे जोगता होय. पुरुषाला जेव्हा देवाला सोडले जाते तेव्हा त्याला जोगता असे म्हणतात. देवाला सोडल्यावर त्यांना स्वतःचे असे कुटुंब राहत नाही, नातेसंबंध उरत नाही. त्यांच्या पुरुषत्वाचे खच्चीकरण करून त्यांना बाईपणाचे रूप दिले जाते. पुरुषाचे शरीर असून देखील सर्वसामान्य पुरुषाप्रमाणे त्याला जीवन जगता येत नाही. इच्छा आकांक्षाचा मानसिक कोंडमारा होतो. जोगत्यांच्या अंत्ययात्रेलाही सामान्य माणूस मिळत नाही, असे भीषण वास्तव गवस यांनी भंडारभोग कादंबरीतून मांडले आहे. जोगता व जोगतीण यांचे समाजातील स्थान हे दुय्यम असते व अनेकदा त्यांचे लैंगिक शोषणही होते. मराठीतील जोगत्यांच्या जीवनावरील ही एकमेव कादंबरी आहे. भंडारभोग या कादंबरीत लेखकाने तायाप्पा नावाच्या जोगत्याची जीवनव्यथा व संघर्षपूर्ण जीवनाचे चित्रण केलेले आहे.



आरती विजयकुमार भोसले

जोगत्यांच्या जीवनावर २५ सप्टेंबर २००९ रोजी जोगवा हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला. सर्वोत्कृष्ट सामाजिक जागृती करणाऱ्या या चित्रपटाला २००९ चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.चित्रपटाची कथा ही राजन गवस ह्यांच्या चौडकं व भंडारभोग या दोन्ही कादंबऱ्यांवर आधारित आहे. ग्रामीण समाजात जोगता-जोगतीणी या रूढी-परंपरांचे निराकरण आणि समाजजागृतीचे मोठे काम या चित्रपटाने केले.

### कादंबरीचे आशयसूत्र :

"भंडारभोग' या कादंबरीत तायाप्पा नावाच्या जोगत्याच्या जीवनाची कहाणी असून लहानपणी

तो अतिशय आजारी पडतो. यल्लमादेवीची पूजा केली नाही व भंडाऱ्याचा अपमान केला म्हणूनच तायाप्पा आजारी पडला अशी अंधश्रद्धा मानली जाते आणि तायाप्पाला बरे करायचे असेल तर त्याला देवीला सोडावे लागेल असा आग्रह तानु जोगतीण व शेवंता जोगतीण यांच्याकडून केला जातो. यावर तायाप्पाची आई कल्लव्वा ही तयार होते आणि घरातल्या मंडळींचा त्यासाठी होकार मिळविते. तो बरा झाला तर त्याला देवीच्या सेवेसाठी सोडू असा नवस त्याची आई बोलते. आणि एके दिवशी तायाप्पा बरा झाल्यानंतर त्याला देवीच्या सेवेला सोडले जाते. या अशा जोगत्यांनी देवदासी बरोबर देवीच्या स्तुतीची गाणी गात गावभर फिरायचे आणि गावातील लोकांनी दिलेल्या धान्यावर आपला उदरनिर्वाह करायचा. तसेच जोगत्यांनी वेषही स्त्रियांसारखाच करायचा. जोगते हे पुरुष असूनही जोगतिणीबरोबरच राहिल्यामुळे स्त्रीप्रमाणेच वागू, बोलू लागतात. समाजदेखील जोगत्यांना पुरुष मानत नाही. हे सर्व जोगत्यांचे नियम तायाप्पाला पाळण्याचा आग्रह केला जातो. हळूहळू तायाप्पा जोगत्यांच्या पंथाचे सर्व नियम व शिस्त आत्मसात करून स्वतःला त्यात सामील करून घेतो. तायाप्पाचे हे जोगतेपण जीवनात त्याला एका दूर अशा वाटेवर नेऊन ठेवते, की जेथून परत मागे कधीच फिरता येत नाही. ही वाट म्हणजे भंडाऱ्याची पिवळी वाट असते. या अंधाराकडे नेणाऱ्या वाटेवर ढकलताना तायाप्पाची आई कल्लव्वा त्याच्या भविष्याचा थोडादेखील विचार करत नाही.

भंडारभोग या कादंबरीबद्दल दिपक घारे आपले मत मांडताना म्हणतात की ''राजन गवस यांनी तायाप्पाची होणारी घुसमट आणि भोवतालच्या जोगतिणीच्या व्यथा प्रभावीपणे मांडल्या आहेत. आशयाला भिडणारी थेट बोली, तपशिलांचा, प्रतिकात्मक वापर आणि सूत्रमय वाक्ये यामुळे कादंबरीतले वातावरण जिवंत वाटते.''

### कादंबरीतील दुःखसंवेदना :

भंडारभोग या कादंबरीत तायाप्पाला जोगत्याचा विधी करीत असताना लुगडे नेसवले जाते, चुडा भरला जातो, कपाळावर भंडारा लावला जातो, डोक्यावर बाशिंग बांधले जाते. मनाविरुद्ध घडणाऱ्या या सर्व क्रियांना तायाप्पा अगतिकपणे, निमुटपणे सहन करीत असतो. जोगत्यांनी बाईसारखे राहावे, सामान्य पुरुषांसारखी वेषभूषा करू नये. अलंकार धारण करावे अशी बंधने घालून एक प्रकाराचे बळजबरीचे आयुष्य जोगत्यांवर समाजाकडून लादले जाते.

पुरुषत्वाचे खच्चीकरण करून, त्याचे माणूसपण हिरावून घेतले जाणे ही जोगत्यांच्या जीवनातील फार मोठी व्यथा आहे. सामाजिक रूढी, परंपरांमुळे पुरुषाला आपले पुरुषत्व, लैंगिक भावना यांपासून फारकत घेऊन बाईपणाचे जीवन जगावे लागते. नैसर्गिक पुरुषत्वापासून बाईपणाच्या मानसिकतेकडे जाताना मनाची होणारी असह्य घुसमट, मानसिक कोंडमारा या कादंबरीच्या चित्रणामध्ये येते. पुरुष असूनही केवळ सामाजिक प्रथा व संकेतांमुळे पुरुषांसारखे सर्वसामान्य जीवन जगता येत नाही ही दुःखाची अगतिकता तायाप्पाच्या व्यक्तिरेखेतून प्राकर्षाने दिसून येते.

### कादंबरीतील व्यक्तिरेखा :

कादंबरीच्या रचनेचा व्यक्तिरेखा हा अत्यंत महत्वाचा घटक असतो. लेखक हा व्यक्तिरेखेच्या माध्यमातूनच त्याचा दृष्टिकोन, कादंबरीची जडणघडण, त्याचे परिसर-कुटुंबातील स्थान, त्याच्याभोवतीचे सामाजिक सांस्कृतिक वातावरण इतर घटना यांतूनच कादंबरीचा विकास किंवा ऱ्हास यांबाबतीत व्यक्तिरेखांची मांडणी महत्वाची ठरते.

भंडारभोग कादंबरीत मुख्य व्यक्तिरेखा तायाप्पाची आहे. तायाप्पाच्या नशिबी आलेले जोगतेपणाचे दुःख हे केवळ त्याच्या एकट्यापुरते मर्यादित नसून ते समूहाचेच दुःख आहे. तायाप्पाच्या व्यक्तिरेखेला केंद्रवर्ती ठेऊन प्रातिनिधिक स्वरूपात जोगत्यांची दुःखाची व्यथा राजन गवसांनी या कादंबरीत मांडली आहे.

गौण व्यक्तिरेखेमध्ये आक्कव्वा, कल्लव्वा, शेवंता मावशी, तानू सुतारीण, दादू जोगता, म्हादू जोगता, रत्नव्वा, यमन्या जोगता, शिवजा, मोरे मास्तर, पारव्वा, राघू जोगता, दादू कुपट्या, कमळाक्का, तमन्या जोगता, तान्नाप्पा, मायाप्पा, सुंदरक्का, गणपू मिसाळ, किसन्या, शिरप्या, कौलग्याचा तुका अशा काही व्यक्तिरेखांचा मोठा समूह आहे. देवदासी, जोगता-जोगतीण या प्रथेचा एक भाग म्हणून यातून येणारी प्रत्येक व्यक्तिरेखा महत्वाची आहे.

एकूणच राजन गवस यांच्या भंडारभोग या कादंबरीत आलेल्या मुख्य आणि गौण व्यक्तिरेखा या समूहासह येतात. आणि एकूणच नायकत्वाचा विचार करता, त्या मुख्य व्यक्तिरेखेला नायकत्व मिळण्याऐवजी समूहालाच ते प्राप्त होते.

### कादंबरीचे मूल्यमापन :

तायाप्पा नावाच्या जोगत्याला स्वतःचे जीवन हे पुर्णपणे दुःखमय, व्यथा-वेदनांनी भरलेले आणि सामाजिक अवहेलना सहन करुन जगावे लागते. जोगत्यांना विवाहसंस्थेपासून दूर ठेवले जाते. पुरुषत्वाचे खच्चीकरण करुन त्यांच्यावर कृत्रिम नपुंसकत्व लादले जाते. लैंगिक भावना व इच्छा यांची जबरदस्तीने दडपणूक केली जाते. तसेच जोगते हे केवळ अंधश्रद्धेच्या मानसिकतेमुळे सामाजिक शोषणाच्या विळख्यात सापडतात. समाजामध्ये त्यांना तिरस्कार, सामाजिक अवहेलना, उपजीविकेचे प्रश्न यांना तोंड दयावे लागते.

जोगता म्हणून जगत असताना समाजातून होणारी विटंबना आणि पौरूषत्वाच्या नैसर्गिक गरजेतून होणारा मानसिक कोंडमारा, व्यथा, वेदना व दुःख अशा दोन पातळ्यांवरचा तायाप्पाचा संघर्ष राजन गवस यांनी मराठी कादंबरीत पहिल्यांदा चित्रित केला आहे.

एकूणच प्रत्येकाला या समाजवास्तवाचा विचार करावयास लावणारी ही कादंबरी आहे आणि यातच या कादंबरीचे वेगळेपण आहे असे म्हणता येईल.

### संदर्भ ग्रंथ -

१.राजन गवस, भंडारभोग, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, २००१
२.कुलकर्णी मदन, देवदासी - यल्लंम्माच्या जोगतिणी, विजय प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली, १९९४
३.वसंत राजस, देवदासी शोध आणि बोध, सुगावा प्रकाशन, पुणे
४.बळवंत कांबळे, देवदासी, पोतराज, 'वाघ्या-मुरळी, रूप-स्वरूप-विकृती', पद्मगंधा प्रकाशन, पुणे
५.घारे दीपक - महाराष्ट्र टाईम्स-२१ मे १९८९, पृ.४

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org